**महाराष्ट्र शासन**
**राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य, मुंबई.**
**मुख्य कार्यालय : ३०५, शासकीय तंत्र निकेतन इमारत, खेरवाडी, अलीयावर जंग मार्ग, वांद्रे (पुर्व), मुंबई ४०० ०५१.**
**क्षेत्रिय कार्यालय : सीईटी सेल, शासकीय दंत महाविद्यालया समोर, सेंट जॉर्ज रुग्णालय आवार, फोर्ट, मुंबई ४०० ००१.**
**: सीईटी सेल, तंत्रशिक्षण संचालनालय, ३, महापालिका मार्ग, मुंबई ४०० ००१.**
ईमेलः maharashtra.cetcell@gmail.com वेबसाईट : www.mahacet.org

क्र.राज्य सीईटी कक्ष/AIA PGET - 2017/नोटीस क्र.२९/ दिनांक :२७.११.२०१७.

# AIA PGET - 2017
# NOTICE No. 29
# ( To Allow AIA PGET - 2017 appeared but not registered candidates on Directorate of AYUSH, Mumbai website)

**शासकीय, शासन अनुदानीत व खाजगी विनाअनुदानित आयुर्वेद, होमिओपॅथी व युनानी महाविद्यालयातील पदव्युत्तर अभ्यासक्रम रिक्त जागांवरील प्रवेशाकरिता "महाविद्यालय स्तरावरील** (Institutional level)" **प्रवेश प्रक्रीया** (Maharashtra Unaided Private Professional Educational Institutions Rule, २०१६ मधील Rule No.१४ )

संदर्भ :- १) नोटीस क्र.२७, दि.२५.११.२०१७.
२) वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, शासन पत्र क्र.एमईडी-१०१७/प्र.क्र. ४८४/१७/शिक्षण-२, दि.२७.११.२०१७.

आयुष मंत्रालय, केंद्रसरकार, नवी दिल्ली यांचे कडील संदर्भ क्रमांक संख्या/ F.No.R.11011/04/2016-EP(IM-1), दिनांक २४/११/२०१७ अन्वये उपरोक्त अभ्यासक्रमाच्या प्रवेशाचा अंतिम दिनांक २९/११/२०१७ पर्यत वाढविलेला आहे. तद्नुषंगाने दि.२५.११.२०१७ रोजी प्रवेश प्रक्रियेचे वेळापत्रक नोटीस क्र.२७ अन्वये संकेतस्थळावर प्रसिध्द झालेले आहे.

उक्त प्रवेशाचा अंतिम दिनांकाचा अल्प कालावधी व मोठया प्रमाणात रिक्त असलेल्या जागा विचारात घेता, शासनाने संदर्भित शासन पत्र दि.२७.११.२०१७ अन्वये दिलेल्या निर्देशानुसार आयुष पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या प्रवेशाकरिता आयुष संचालनालयाच्या संकेतस्थळावर (**www.mahayush.gov.in**) ज्या उमेदवारांनी नोंदणी केलेली नाही, परंतु AIA PGET 2017 च्या पदव्युत्तर प्रवेश परीक्षा दिलेली आहे, असे उमेदवार दि.२९.११.२०१७ च्या महाविद्यालयीन स्तरावरील प्रवेश प्रक्रियेस पात्र राहतील. अशा उमेदवारांनी नोटीस क्र.२७, दि.२५.११.२०.१७ अन्वये संकेतस्थळावर प्रसिध्द झालेल्या वेळापत्रकानुसार व सूचनेनुसार अर्ज केलेल्या महाविद्यालयात प्रवेश घेण्याकरिता AIA PGET 2017 च्या माहितीपुस्तिकेमध्ये नमूद केलेली मुळ प्रमाणपत्रे व महाविद्यालय सोडल्याच्या दाखल्यासह उपस्थित रहावे. महाविद्यालयास प्राप्त झालेल्या अर्जामधून राज्य सामाईक परीक्षा कक्षाव्दारे नियुक्त निरीक्षकांच्या देखरेखीखाली AIA PGET 2017 च्या गुणवत्तेनुसार उमेदवारांचे प्रवेश होतील.

सही /-
(राजीव निवतकर) भा.प्र.से.
सक्षम प्राधिकारी तथा आयुक्त, राज्य सीईटी कक्ष,
महाराष्ट्र राज्य